१७ जून २०२४ रोजी साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रक १७ व्या वर्षात पदार्पणानिमित्त १६ व्या वर्धापन दिन व व्हेबन्यूज शुभेच्छा संदेश जाहिरातीसाठी १८ ते २४ विशेषांक प्रकाशित करणार आहे.
facebook pragatbharat
www.pragatbharat.com
9860 877 789


# प्रगत भारत

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

• वर्ष:१६ • अंक क्र.४४ • साप्ताहिक • मंगळवार दि.१४ ते २० मे २०२४ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट-PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## तब्बल ११ वर्षानंतर डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणाचा निकाल

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पुणे:–** पुण्यातील विशेष न्यायालयाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात ११ वर्षांनी निकाल जाहीर केला आहे. या प्रकरणात एकूण पाच आरोपी होते. त्यापैकी सचिन अंदूरे आणि शरद कळसकर या दोन मारेकऱ्यांना दोषी मानून विशेष न्यायाधीशांनी या दोघांना जन्मठेप सुनावली आहे. त्याचबरोबर पाच लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. तसेच या प्रकरणातील उर्वरित तीन आरोपी डॉ.वीरेंद्रसिंह तावडे,संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. यावेळी मुक्ता दाभोलकर म्हणाल्या, तब्बल ११ वर्षे विवेकाच्या मार्गाने आपण ही लढाई लढलो आणि आता न्याय आपल्या दृष्टीपथात आला आहे. ही भावना आमच्यासह सर्वांच्या मनात कायम जागृत राहील. मारेकऱ्यांना शिक्षा सुनावली. याबद्दल आम्ही समाधानी आहोत. मात्र ज्या तिघांना शिक्षा झाली नाही त्यांच्याविरोधात आम्ही उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ. आमचे वकील अभय नेटगी यांच्या मार्गदर्शनात आतापर्यंतची आमची वाटचाल चालू होती, जी पुढेही चालू राहील.

## मराठवाडा जनविकास संघाच्या वतीने जगदगुरू तुकोबारायांच्या चरणी रास भरुन अर्पण केला आंब्यांचा महानैवेद्य



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**पुणे:** साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर मराठवाडा जनविकास संघाच्या वतीने भंडारा डोंगरावरील जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या चरणी रास भरुन आंब्यांचा महानैवेद्य दाखविण्यात आला.पूजा,आरती करून आपल्या आमराईतील आंबे गाभाऱ्यात आकर्षकपणे मांडण्यात आले.मंदिरात फुलांनी सजावट करण्यात आली होती. अशा प्रसंन्न वातावरणात अक्षयतृतीयेच्या निमित्ताने संत तुकोबाचरणी सेवा अर्पण करण्यात आली. यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार, धारूरचे सरपंच बालाजी पवार, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ. प. बाळासाहेब काशीद, ह. भ. प. जगन्नाथ नाटक पाटील, ह. भ. प. जोपाशेठ पवार, ह.भ.प. ढमाले मामा, संजीव पवार, ह.भ. प. अनिल कारके, ह. भ.प. राजेंद्र महाराज ढोरे, ह.भ.प. पंडित बसे, ह. भ. प. राजाराम बोत्रे, ह.भ. प. नारायण भेगडे, ह.भ.प. शिवाजी शेलार, विजया कारके, तसेच पवार परिवारातील सदस्य, भाविक उपस्थित होते. दरम्यान, आंब्याची आरास पाहण्यासाठी तसेच जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटेपासून मोठी गर्दी केली होती. आंब्याचा हा प्रसाद भाविक भक्तांना देण्यात येणार आहे. अरुण पवार यांनी सांगितले, की माझे बंधू सरपंच बालाजी पवार यांनी मेहनत घेऊन मराठवाड्यामध्ये पाण्याची समस्या असतानाही टँकर, तसेच शेततळ्याच्या माध्यमातून ५००० केसर आंब्याच्या झाडांचे संगोपन करून शेती फुलवलेली आहे. आमच्या आमराईतील आंबे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या चरणी अर्पण करून सेवा केली. यंदा पावसाने पाठ फिरविल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणची झाडे सुकून चालली आहेत. आम्हाला ज्या ठिकाणची झाडे पाण्याअभावी सुकत असल्याचे दिसताच पाणी देऊन झाडांना जीवनदान देत आहोत. यावर्षी लवकर पाऊस येऊन पाण्याचा प्रश्न सुटावा, आणि संपूर्ण महाराष्ट्रातील देशातील शेतकरी माझा बळीराजा सुखी व्हावा अशी जगद्गुरू संत तुकाराम महाराज चरणी प्रार्थना केली आहे

## मोहोळ, धंगेकर, मोरे यांचे भाग्य मतपेटीत बंद ; ४ जूनला निकाल

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पुणे:–**महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि वंचितचे उमेदवार वसंत मोरे या तिन्ही प्रबळ उमेदवारांचे भाग्य मतपेटीत बंद झाले. पुणेकरांनी नेमका कोणाच्या बाजूने कौल दिला, त्याचा निकाल येत्या दिनांक ४ जून रोजी जाहीर होणार आहे.


वरील तिन्ही उमेदवारांनी रात्रंदिवस प्रचार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनाशर्थ पाठिंबा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला. त्यानंतर या पक्षाची मते कोणाला मिळणार याकडे लक्ष लागले आहे.: आतापर्यंत झालेले मतदान महायुतीला अनुकूल असून चौथ्या टप्प्यापर्यंत चांगले यश महायुतीला मिळेल सुनिल तटकरे

महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी मनसेच्या मातांमुळे फायदा होणार असल्याचे सांगितले आहे.पण,पूर्वाश्रमीचे मनसेचे नगरसेवक असलेल्या रवींद्र धंगेकर आणि वसंत मोरे यांनाही ही मते मिळणार असल्याची कुजबुज सुरू आहे.कोणत्याही परिस्थितीत पुणे लोकसभा निवडणूक एकतर्फी होऊ देणार नसल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांनी निक्षून सांगितले आहे. २०१२ मध्ये मनसेचे तब्बल २७ नगरसेवक निवडून आले होते. कै. रमेश वांजळे यांच्या रूपाने खडकवासला मतदारसंघात मनसेचा आमदारही निवडून आला होता.




## आपल्या देशाची 'भारत' ही ओळख प्राचीन – संजीव सन्याल

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com




**पुणे:–** आपल्या देशाची 'भारत' ही ओळख अत्यंत प्राचीन असून ती काळानुसार अधिक दृढ होत गेली असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, लेखक व पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे सदस्य संजीव सन्याल यांनी केले.'पुणे संवाद' उपक्रमांतर्गत आयोजित 'भारतवर्ष द ओरीजिन्स ऑफ अवर सिव्हिलायझेशनल आयडेंटीटी'या विषयावर त्यांचे व्याख्यान कर्नाटक शाळेच्या शंकुतला शेट्टी सभागृहात संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रसिद्ध उद्योगपती अभय फिरोदिया व पुणे संवाद उपक्रमाचे संयोजक मनोज पोचट उपस्थित होते.

सर्वप्रथम भारत तृत्सू नावाचा एक वेदिक समुदाय हा पवित्र सरस्वती नदीच्या काठावर असल्याच उल्लेख ऋग्वेदात मिळतो. या समुदायाचा प्रमुख सुदास व वसिष्ठ ऋषींनी इतर दहा समुदायांना हरविले आणि सुदास भारतचा पहिला चक्रवर्ती राजा झाल्याचा उल्लेख मिळतो. त्यांनर त्यांनी सगळ्या समुदायांचे व त्यांच्या तत्वज्ञानाचे एकत्रीकरण करून वेदांच्या संहितेमध्ये रुपांतर केले. अशा रीतीने पहिल्या सभ्यतेचा पाया आपल्या देशात रचला गेला. त्यामध्ये विरोधापेक्षा एकत्रीकरण करण्यावर भर होता. पुराणांमध्ये, प्रामुख्याने ब्रह्म पुराणामध्ये व महाकाव्यांमध्ये समुद्राच्या उत्तरेला आणि हिमालयाच्या दक्षिणेला असलेला देश हा भारत असून तेथील लोकांना भारती असे संबोधलेले दिसते. तसेच यावरून भारतच्या भौगोलिक व सांस्कृतिक इतिहासाचा मेळ घालता येतो व भारत ही आपली ओळख किती प्राचीन आहे हे समजायला मदत होते, भारतातील शक्तीपीठे,पर्वतरांगा,नद्या,परदेशी प्रवाशांनी केलेली वर्णनं, शंकराचार्यांनी केलेला प्रवास व त्यांनी स्थापन केलेली भौगोलिक दृष्ट्या महत्वाची पीठे या सर्वांचा अभ्यास केला असता आपल्या असे निदर्शनास येते की भारताची एक सुसंस्कृत राष्ट्र म्हणून असलेली ओळख खूप प्राचीन आहे.नवनवीन कल्पनांचा अंगीकार करत गेली हजारो वर्ष ही ओळख विकसित होत गेली.त्यावर व्यापार,विचारांचे आदान प्रदान, स्थलांतर,परकीय आक्रमणे आदी बाबींचा मोठा परिणाम देखील झाला, असेही ते म्हणाले.ब्रिटीश राजवटीतून स्वतंत्र झाल्यावर भारतीय गणराज्याचा पाया रचताना हे प्राचीन संस्कृतीचे आधुनिक प्रकटीकरण आहे या गोष्टीचा मान सर्व संस्थापकांकडून राखला गेल्याचे आपल्याला दिसून येते, ही बाब सन्याल यांनी आपल्या भाषणादरम्यान अधोरेखित केली. सन्याल यांनी भारतातील समृद्ध अशा वैदिक संस्कृतीचे अनेक दाखले दिले. भारत हा सप्त नद्यांचा देश असून त्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. फक्त पंजाबमध्ये नाही तर भारताच्या इतर प्रांतांमध्येही सात नद्या होत्या असे त्यांनी सप्रमाण सिद्ध करण्याच्या प्रयत्न आपल्या भाषणादरम्यान केला. सन्याल यांनी आपल्या व्याख्यानादरम्यान दिलेल्या विविध संदर्भांशी संबंधित ऋचांचे पठण संस्कृत भाषेच्या काही विद्यार्थिनींनी सादर केले.

नव्या पिढीला भारताच्या समृद्ध अशा प्राचीन संस्कृतीविषयी गोडी निर्माण करण्यासाठी सुरुवातीला लोकप्रिय साधनांचा वापर करावा, असा सल्ला देखील संजीव सन्याल यांनी यावेळी उपस्थितांना दिला. ते म्हणाले की त्यांना स्वतःला या विषयात अमर चित्रकथा वाचून गोडी निर्माण झाली. तुलसीदासांचे रामायण देखील अशा साहित्याचे एक उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कन्नड संघ, पुणेच्या सचिव मालती कलमाडी यांच्या हस्ते संजीव सन्याल व अभय फिरोदिया यांच्या सत्कार करण्यात आला.

## शिक्षक,पदवीधर विधान परिषद निवडणूक पुढे ढकलली



**मुंबई:–**लोकसभा निवडणुकीची रणधुमाळीतच जाहीर करण्यात आलेली विधान परिषद निवडणुकीबाबत महत्वाची माहिती आली आहे. शिक्षक, पदवीधरच्या चार मतदारसंघांसाठी जाहीर केलेली निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर, तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. या चार जागांसाठी येत्या १० जून रोजी मतदान होणार होते, तर १३ जूनला मतमोजणी केली जाणार होती.शाळांमधील उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर ही निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने या संदर्भात विचारविमर्श करून महाराष्ट्र विधान परिषदेच्या उक्त द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम नंतरच्या तारखेपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबरचे परिपत्रकही जाहीर करण्यात आले आहे. विधानपरिषदेत मुंबई पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे उद्धवसेनेचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे निरंजन डावखरे, मुंबई शिक्षकचे कपिल पाटील व नाशिक शिक्षकचे किशोर दराडे यांची सदस्यत्वाची मुदत ७ जुलै २०२४ रोजी संपत आहे. त्यामुळे या चार जागांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा महायुती आणि महाविकास आघाडी आमने-सामने येणार आहेत

## श्रीरंग बारणे आणि संजोग वाघिरे यांचे प्राबल्य असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्येच आतापर्यंत कमी मतदान

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पुणे:**मावळ लोकसभा मतदारसंघात सकाळाच्या सत्रात चांगले मतदान झाल्याचे दिसते. सकाळी सात ते दुपारी एक या सहा तासात २७.१४ टक्के मतदान झाले.

पुणे आणि रायगड जिल्ह्यात विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये ६ विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो.त्यामध्ये कर्जतमध्ये सर्वाधिक २९.४७ टक्के मतदान झाले. पनवेलमध्ये २६.९३ टक्के, उरणमध्ये २९.०६ टक्के, चिंचवड २६.१२ टक्के, पिंपरी २३.९६ टक्के आणि मावळ विधानसभा मतदारसंघात २८.०३ टक्के मतदान झाले. दुपारी एक वाजेपर्यंत २७.१४ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. पहिल्या दोन तासात ५.३८ टक्के,दुसऱ्या दोन तासात १४.८७ टक्के तर तिसऱ्या दोन तासात २७.१४ टक्के मतदान झाले आहे. सकाळच्या सत्रात मतदानाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते.

ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

# संपादकीय

## केजरीवाल यांची निवडणूकीमधील भूमिका महत्वाची ठरणार..?

देशामधील होत असलेली १८ वी लोकसभा निवडणूक ही विविध पक्षांच्या नेते व पक्षप्रमुख यांनी आपली बाजू मांडत निवडणूकीचा प्रचार प्रसार करीत आहेत.या मधील मागील दोन लोक सभा निवडणूकींमध्ये भाजपाला चांगल्या प्रकारची साथ ही मतदारांची मिळाली होती पण आजच्या स्थितीला भाजप सत्तेत येणार नाही, असे केजरीवाल यांचे म्हणणे आहे. भाजपला २२० ते २३० या दरम्यान जागा मिळतील, असे भाकीत त्यांनी वर्तविले आहे. केजरीवाल यांच्यामुळे पंजाबसह हरयाना आणि दिल्लीत भाजपपुढील आव्हान बिकट राहील. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची हंगामी जामिनावर सुटका झाली. मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात ईडीने त्यांना अटक केल्यापासून ते तुरुंगात होते. जामिनावर बाहेर येताच केजरीवाल आक्रमक होणार, हे अपेक्षित होतेच. त्यांच्या आक्रमक प्रचाराचा सामना करण्याचे आव्हान भाजपसमोर उभे राहिले आहे. दिल्लीत आम आदमी पक्षाच्या मुख्यालयात त्यांनी घणाघाती भाषण करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'लक्ष्य' केले. यावेळची निवडणूक मोदींनी जिंकल्यास उद्धव ठाकरे, ममता बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांमधील अनेक नेते तुरुंगात जातील असे केजरीवाल म्हणाले. अमित शहांना पंतप्रधान करण्यासाठी मोदी मते मागत आहेत, असे विधान करून त्यांनी भाजपच्या गोटात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थात, अमित शहांनी तातडीने ती शक्यता फेटाळत मोदी हेच भाजपचे नेते राहतील, असा खुलासा केला. पंचाहत्तरीनंतर ज्येष्ठ नेते राजकारणात नकोत, ही भूमिका घेत भाजपच्या आताच्या सर्वेसर्वा नेत्यांनी अडवानी, मुरली मनोहर जोशी यांच्यासह अनेक ज्येष्ठांना 'निवृत्त' केले. वयासंदर्भात असा काही निर्णयच झालेला नाही, ही आता भाजपची सारवासारव. अर्थात, मोदी-शहा म्हणजे भाजप हे जेवढे खरे, तेवढेच 'आप' म्हणजे केजरीवाल हे समीकरण! योगेंद्र यादव, प्रशांत भूषण या 'आप'च्या संस्थापकांसह तेव्हाचे सहकारी कुठे आहेत? याचे उत्तर केजरीवाल यांना देता येते कठीण! निवडणुकीच्या काळात केजरीवाल यांच्यासारखा प्रबळ विरोधी नेता गजाआड, हे चित्र लोकशाही संकेताच्या विरुद्ध होते. त्यांच्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपावरून कारवाई झाली, ही वस्तुस्थिती. मात्र, ईडीच्या कारवाया भाजपच्या विरोधकांना नमवण्यासाठीच असतात, याची सर्वांनाच खात्री आहे. त्यामुळे तुरुंगात गेल्याने केजरीवालांच्या प्रतिमेला तडा गेला, असे दिसलेले नाही. केजरीवालांना सहानुभूती तुरुंगात असताना त्यांना सहानुभूती वाढली. त्यातून भाजपची अडचण झाली. आता बेधडक बोलणारे केजरीवाल धोकादायक की ते तुरुंगात असताना त्यांना वाढलेली सहानुभूती अधिक अडचणीची होती, याची तुलना करण्याची वेळ भाजपवर आली आहे! केजरीवाल बाहेर आल्याने स्वाभाविकपणे काही दिवस त्यांच्यावर प्रकाशझोत राहील. विरोधी पक्षांतील महत्त्वाकांक्षी नेते पाहता त्यांचीही याबाबतीत अडचण म्हणायला हवी! कारण मोदी विरुद्ध केजरीवाल, असे लढतीचे चित्र उभे राहू शकते. मुंबईतील लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेला मोदी येणार आहेत आणि महाविकास आघाडीच्या त्याच दिवशीच्या सभेत केजरीवाल यांची उपस्थिती आहे. केजरीवाल जवळपास पन्नास दिवस तुरुंगात होते. त्यांना मिळालेल्या जामिनाची मुदत एक जूनपर्यंत आहे. त्यांना प्रचारासाठी बाहेर येता येऊ नये याकरता ईडीने आटोकाट प्रयत्न केला; पण सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढत ईडीला झटका दिला. प्रचार करणे हा मूलभूत अधिकार नाही, प्रचारासाठी जामीन देण्याचा पायंडा पडल्यास अनेकांना ती मुभा द्यावी लागेल, असा पवित्रा ईडीने घेतला. विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह लागलेल्या या तपास यंत्रणेकडे न्यायालयाने दुर्लक्ष केले. 'चारशे पार' ही घोषणा देऊन भाजपने चूक केली, असा मतप्रवाह दिसतो. ती केल्याने आणि फार अनुकूल म्हणता येईल असे वातावरण नसल्याने एकेक जागा भाजपसाठी महत्त्वाची आहे. भाजपच्या आशा दिल्लीतील सात जागांवर केंद्रित होत्या. तेथील लढती सोप्या नाहीत, हे भाजपला समजून चुकले आहे. आतापर्यंत भाजप 'विषय पत्रिका' तयार करून विरोधकांना त्यावर बोलणे भाग पाडत होता. या निवडणुकीत राहुल, केजरीवाल या नेत्यांच्या भूमिकेला, आरोपांना उत्तर देण्याची वेळ भाजपवर आली आहे. केजरीवालांच्या प्रचारामुळे वातावरण तापणार असून त्यांच्या सुटकेमुळे 'इंडिया' आघाडीचा हुरूप वाढला असल्याचे दिसते.

## माजी महापौर मोहनसिंग राजपाल यांचे निधन

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पुणे:-** पुणे शहराचे माजी महापौर मोहनसिंग राजपाल यांचे शनिवारी (दि.२७) दीर्घ आजाराने निधन झाले. मोहनसिंग राजपाल हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. त्यातच त्यांनी वयाच्या ७७ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. राजपाल यांची पुण्याचे पहिले शिख महापौर अशी त्यांची ओळख होती. तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांचे विश्वासू म्हणून मानले जात. तसेच त्यांची 'बाबुजी' म्हणून ओळख होती. मोहनसिंग राजपाल हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक होते. शहराचा मध्यवर्ती पेठांचा भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टिळक आयुर्वेदिक महाविद्यालय प्रभागातून ते नगरसेवक म्हणून निवडून आले होते. १९९६-९७ वर्षानंतर २००९ साली महापालिकेचे पुरूष महापौर म्हणून काम करणारे राजपाल हे दुसरे महापौर ठरले होते. ाना २००९ ते २०१२ या अडीच वर्षांसाठी राजपाल यांनी महापौर म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

## चीनच्या कारवायांवर नजर ठेवण्यासाठी फिलिपाइन्सकडून युद्धनौका तैनात

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**मनिला :** दक्षिण चीन समुद्रातील विवादित भागात चीनच्या कारवायांवर नजर ठेवण्यासाठी फिलिपाइन्सने युद्धनौका तैनात केली आहे. विवादित भागात चीन कृत्रिम बेट बनवत असल्याचा फिलिपाइन्सचा आरोप आहे.

राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस ज्युनिअर यांच्या कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, चीनने दक्षिण चीन समुद्रातील काही बेटांवर मोठ्या प्रमाणात भूसंपादन केले आहे, हवाई दल आणि इतर लष्करी सुविधांची उभारणी केली आहे. बीजिंग आणि मनिला चीन समुद्रातील विवादित भागावरून यांच्यात गेल्या वर्षभरापासून दक्षिण वाद सुरू आहे. या ठिकाणी दरवर्षी तीन ट्रिलियन डॉलर्सचा व्यापार होतो. त्यामुळे चीन या ठिकाणी कृत्रिम बेट बनवण्याच्या तयारीत आहे. फिलिपाईन्सच्या पलावान प्रांतापासून १२४ मैल अंतरावर असलेल्या या भागात तटरक्षक दलाला प्रवाळांचे ढिगारे सापडले आहेत. प्रवाळांचे हे ढिगारे नैसर्गिक आहेत की, मानवी हस्तक्षेपामुळे झाले आहेत, हे ठरवण्यासाठी तटरक्षक दल सागरी शास्त्रज्ञांना या भागात घेऊन जाणार आहे. चीनच्या बेकायदेशीर हालचालींवर नजर ठेवण्यासाठी युद्धनौका तैनात करण्यात आली आहे.
यामुळे देशाच्या सुरक्षामध्ये नक्कीच भर पडलेली दिसत आहे

## कर्मवीर भाऊराव पाटील स्मृती दिना निमित रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पिंपरी:-** कर्मवीर भाऊराव पाटील हे समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. भाऊरावांनी मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली.ते ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्वाचे सदस्य होते.त्यांचा भारतीय स्वातंत्र्यलढयात हि सहभाग होता. भाऊरावांनी कमवा व शिका हि संकल्पना राबऊन गरीब विद्यार्थांना रोजगार व शिक्षण उपलब्ध करून दिले.भाऊराव पाटील यांनाअस्पृश्यतेबद्दल प्रचंड चीड होती. भाऊराव पाटील यांच्यावर शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्यांचा प्रभाव होता. महाराष्ट्राच्या जनतेने भाऊराव पाटलांचा कर्मवीर हि पदवी देऊन गौरव केला. तसेच भारतीय केंद्रशासनाने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन गौरविले.पुणे विद्यापीठाने त्यांना इसवी सन १९५१ मध्ये डी. लिट. हि पदवी दिली. रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले . त्यांच्या प्रतिमेला संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी संस्थापक धम्मराज साळवे यांनी असे मत व्यक्त केले कि, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे व त्यांच्या कमवा व शिका या संकल्पनेमुळे ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नव्हते ज्यांची परिस्थिती हलाखीची होती.अशी मुले आज मोठ्या पदावरती काम करत आहेत. भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष झालेला आहे व आशिया खंडात आज सर्वात मोठी रयत शिक्षण संस्था नामांकित आहे. व रयत विद्यार्थी विचार मंच संस्था देखील कर्मवीरांच्या पाऊलावर पाऊल ठेवत काम करेन.गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक न्याय हक्कासाठी काम करेल.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष मयूर जगताप, पिंपरी चिंचवड प्रभारी योगेश कांबळे व इतर पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

सुवर्णसंधी सभासद अभियान..
लग्नाचा/वाढदिवस शुभेच्छा २ जाहिराती मोफत मिळवा ...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचे द्विवार्षिक सभासद व्हा.व १,०००/- रूपये भरून घरपोच अंक मिळवा. आपली माहिती सभासद/इत्यादी फॉर्म मो.संपर्क.नं.९८६०८७७७८९खालील लिंक/QR वर भरा https://v.ht/pragatbharat. पाठवा संपर्ककरा

## हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकासाठी १० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**मुंबई:-** यंदाच्या शैक्षणिक सत्रात इंडियन इन्स्टीट्युट ऑफ हॅन्डलूम टेक्नॉलीजी, बरगढ, ओडिशा येथील तीन वर्षीय हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेच्या प्रथम व व्दितीय वर्षासाठी महाराष्ट्रातील पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश अर्ज मागविण्यात आले असून इच्छूक उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज १० जूनपर्यंत संबंधित प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहासत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडीशा) साठी १३ जागा व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी १ जागा राखीव आहेत. तसेच वेंकटगिरीसाठी २ जागा तसेच द्वितीय वर्षासाठी ३ जागांपैकी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी १ जागा राखीव असून प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर, सोलापूर, मुंबई, औरंगाबाद यांच्यामार्फत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज १० जूनपर्यंत मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने इच्छुक उमेदवारांनी आपले परिपूर्ण अर्ज १० जूनपर्यंत संबंधित प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे ... या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे, असे वस्त्रोद्योग आयुक्त अविष्यांत पंडा यांनी कळविले आहे.

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत
वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

## विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये गरजू मुलींकरिता प्रवेश सुरु

**पुणे:-** विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात मुलींसाठी प्रवेश सुरू झाले आहेत. ग्रामीण भागातील गरजू, होतकरू आणि अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थिनी ज्यांनी उच्च शिक्षणासाठी पुण्यात प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थिनींनी या टप्प्यात अर्ज करावेत, असे समिती व्यवस्थापनाने कळविले आहे. पुण्यात मुलींसाठी नवे वसतिगृह बांधले आहे. तेथे ३३६ मुलींची व्यवस्था वाढणार आहे. ग्रामीण भागातील ज्या विद्यार्थिनी सध्या दुसऱ्या, तिसऱ्या आणि त्यापुढील वर्गात पुण्यातील महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत आणि त्यांची निवास, भोजनाची अडचण आहे, अशांना समितीच्या वेबसाईटवर (..) जाऊन प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरता येतील. अर्जाची छाननी होऊन मुलाखतीनंतर प्रवेश निश्चित केले जातील. समितीचे कार्य केवळ समाजाच्या मदतीवर ६९ वर्षे सुरू असून, सध्या पाच वसतिगृहांतून ७५० मुला-मुलींसाठी व्यवस्था उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील मुलींचे पुण्यात शिक्षणाला येण्याचे प्रमाण वाढल्याने अजून एका वसतिगृहाची उभारणी केल्यामुळे ही संख्या सुमारे ११०० होणार आहे. केवळ कमी खर्चात निवास, भोजनाची सुविधा पुरविणे एवढाच समितीचा हेतू नसून, युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून समिती काम करते, असे संस्थेने कळवले आहे.



## सा.प्रगत भारत वृत्त.. गुन्हेगारी

# बनावट स्पेअर पार्ट विक्री प्रकरणी दुकानदारावर गुन्हा

**पिंपरी:–** होंडा कंपनीचे बनावट स्पेअर पार्ट विक्री केल्या प्रकरणी एका दुकानदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुरुवारी (दि. ९) सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास क्रांतिवीर नगर, थेरगाव येथे करण्यात आली. गोविंद वनाराम सिरवी (वय ३०, रा. काळेवाडी. मूळ रा. राजस्थान) असे गुन्हा दाखल झालेल्या दुकानदाराचे नाव आहे. याप्रकरणी रेवणनाथ विष्णू केकान (वय ४१, रा. हडपसर) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिरवी यांचे थेरगाव येथे स्पेअर पार्ट विक्रीचे दुकान आहे. त्यांनी दुकानात होंडा मोटार सायकल आणि स्कूटर इंडिया प्रायव्हेट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे बनावट स्पेअर पार्ट विक्रीसाठी ठेवले. त्यासह होंडा नावाचे प्लास्टिक स्टीकर देखील दुकानात ठेवले. बनावट स्पेअर पार्ट खरे असल्याचे ग्राहकांना सांगून त्याची विक्री केली. याबाबत कंपनीला माहिती मिळाल्यानंतर कंपनीकडून कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये तीन लाख ४९ हजार ७४१ रुपये किमतीचे स्पेअर पार्ट जप्त करण्यात आले आहेत. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

## श्रीमती सुमन नाना खळदकरयांचे निधन



**पिंपरी:**संत तूकाराम नगर येथील जेष्ठ महिला श्रीमती सुमन नाना खळदकर (वय वर्षे ७७) यांचे वृध्दापकाळा मुळे दिनांक ०३ एप्रिल २०२४ राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले,व दोन मुली सुना व नातवंड असा परिवार आहे.यांच्या पार्थिवावर नेहरूनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दशक्रिया विधी शुक्रवार १२ एप्रिल २०२४ कासारवाडी स्मशान भुमीत करण्यात आला.यावेळी त्यांचे नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होता.सा.प्रगत भारत वृतपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे अमर ज्योत मित्रमंडळ यांच्या वतीने वतीने भावपुर्ण श्रध्दांजली.

# हरित मतदान केंद्रावर मतदान केलेल्या मतदारांना आयुक्तांकडून वृक्षरोपट्याचे वाटप..

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**पिंपरी:–** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

अजमेरा कॉलनी, पिंपरी येथील मतदान केंद्रावर जाऊन त्यांनी सपत्नीक मतदान केले.आयुक्त शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून शहरात महापालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धन विषयक संदेशाचा प्रचार व्हावा यासाठी चार हरित मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहेत. उद्यान विभागाचे उप आयुक्त रविकिरण घोडके तसेच सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी २४२ आयुर्वेदिक वनस्पतीं, नक्षत्र वाटिका आणि आयुर्वेदिक औषधी वृक्ष यांची माहिती देणारे फलक तसेच मतदान झाल्यानंतर पर्यावरणाचा संदेश प्रदर्शित करणारे आकर्षक सेल्फी पॉईंट लावण्यात आले आहेत. आज आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते मतदान करणा-या मतदारांना वृक्षरोपांचे व बिजांचे वाटप करण्यात आले, यावेळी उप आयुक्त रविकिरण घोडके, आण्णा बोदडे तसेच निवडणूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. उद्यान विभागाकडून उभारण्यात आलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमांस नागरिकांकडून उत्स्फूर्त



प्रतिसाद मिळाला, तर पिंपळे सौदागर येथील पी. के. इंटरनॅशनल स्कूल, या हरित मतदान केंद्रातही मतदान करणा-या मतदारांना वृक्षरोपांचे वाटप करण्यात आले.

# सीबीएसई बोर्डाचा दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर

**पिंपरी:–** सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (CBSE) ने आज (१३ मे) रोजी इयत्ता १० वी व १२ वी चा निकाल जाहीर केला आहे.

आज सकाळी सुरुवातीला १२ वीचा निकाल घोषित करण्यात आला व आता त्यापाठोपाठ CBSE इयत्ता १ ० वीचा निकाल सुद्धा जाहीर केला आहे.इयत्ता १० वी आणि १२ वीचे विद्यार्थी बोर्डाची अधिकृत वेबसाइट Cbse.gov.in, cbsersults.nic.in, सह results.digilocker.gov.in आणि umang.gov.in या ठिकाणी सुद्धा आपला निकाल तपासू शकतात. विद्यार्थी त्यांचा रोल नंबर, शाळा क्रमांक, जन्मतारीख आणि ॲडमिट कार्ड आयडी टाकून सीबीएसई दहावीचा निकाल तपासू शकतात. प्राप्त माहितीनुसार, यंदा १२ वी प्रमाणेच इयत्ता १० वीच्या एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी सुद्धा वाढली आहे. २०२४ मध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ९३. ६० इतकी नोंदवली आहे जी मागील वर्षीच्या ९३. १२ टक्के इतकी होती. गतवर्षीप्रमाणे यंदाही त्रिवेंद्रम दहावीच्या निकालात सर्वोत्तम कामगिरी करणारा जिल्हा ठरला

# पहिल्या मतदानाचा युवा मतदारांच्या चेहऱ्यावर आनंद

## मावळ, पुणे, शिरूर लोकसभा मतदार संघात

## आपल्या पहिल्याच मतदानाचा हक्क बजावणाऱ्या युवा मतदारांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**पुणे:** गेल्या तीन वर्षात पद्धतशीर प्रयत्न केल्यामुळे जिल्ह्यात नव मतदारांच्या नोंदणीला उत्तम प्रतिसाद मिळाला.

असंख्य युवा मतदार मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या उत्सवात सहभागी झाले. मावळ, पुणे, शिरूर लोकसभा मतदार संघात आपल्या पहिल्याच मतदानाचा हक्क बजावणाऱ्या युवा मतदारांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. युवा मतदार आपल्या मित्रमैत्रिणी आणि पालकांसोबत मतदान करायला केंद्रावर जाताना विविध ठिकाणी दिसत होते. प्रथमच मतदान करायचे असल्याने त्यांना मतदानाच्या प्रक्रियेबद्दल कुतूहलही होते. सर्व केंद्रावर नियमानुसार मतदान प्रक्रिया सुरळीत असल्याचे पाहून निवडणूक आयोगाचे आणि प्रशासनाचे कामकाज शिस्तीत सुरू असल्याबाबत काहींनी अभिमानाची भावना व्यक्त केली. भारताची लोकशाही बळकट करण्यासाठी आपण प्रत्येक वेळी





मतदान करणार आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊ असा निर्धार हे नवमतदार व्यक्त करताना दिसत होते. **झुबिया शेख:–** मी मतदानाचा हक्क प्रथमच बजावत आहे. आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी माझ्या एका मतानेही योगदान देता येते. त्यामुळे मला खूप आनंद होत आहे. **देवराणी कुदळे:–** मी प्रथमच पालकांसोबत मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्रावर वृद्ध नागरिक, दिव्यांग यांना प्राधान्य देण्यात येत होते. मतदान केंद्रावर मतदारांच्या स्वागतासाठी चांगली तयारी केली होती. नियुक्त करण्यात आलेले अधिकारी, कर्मचारी मतदान केंद्रावर मतदान ओळखपत्राची व पडताळणी खूप कमी वेळात करत असल्याने कोणतीच अडचण येत नव्हती. मतदान केल्यानंतर एक वेगळाच आनंद मिळाला.

# रेड झोनमुक्त पिंपरी–चिंचवड'साठी पाठपुरावा करणार!उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पिंपरी–चिंचवड:–**पिंपरी–चिंचवडमधील'रेडझोन'चा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. अनेकदा बैठक झाली.तत्कालीन संरक्षण मंत्री मनोहर पर्रिकर यांनीही सकारात्मक भूमिका घेतली होती. पण, हा प्रश्न सोडवण्यासाठी पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. देशात नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील आणि शिरुरमधून शिवाजीराव आढळराव पाटील हे खासदार होतील. त्यामुळे 'रेड झोनमुक्त पिंपरी–चिंचवड' करण्यासाठी आम्ही पुन्हा संरक्षण विभाग आणि प्रधानमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहोत आणि हा प्रश्न सोडवणार आहोत,असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शिरुर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारानिमित्त भोसरी येथील गावजत्रा मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली.

यावेळी फडणवीस बोलत होते. आमदार महेश लांडगे यांनी आपल्या भाषणात 'रेड झोन' बाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधले. फडणवीस यांच्या सहकार्यामुळे शहरातील शास्तीकर, उपयोगकर्ता शुक्ल, कचरा प्रक्रिया प्रकल्प, स्वतंत्र पोलीस आयुक्तालय, समाविष्ट गावांचा विकास, आंद्रा, भामा आसखेड पाणी प्रकल्प आदी 'भोसरी व्हीजन–२०२०'मधील सर्व महत्वपूर्ण विषय मार्गी लागले.


मोदी सरकार धाडसी निर्णय घेण्यासाठी ओळखले जाते. हा प्रश्न तुम्हीच सोडवू शकता त्यामुळे पिंपरी–चिंचवडकरांची 'रेड झोन'ची मुक्तता करावी, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले.दरम्यान, २०१४ मध्ये राज्यात भाजपा प्रणित सरकार स्थापन झाल्यापासून भोसरीतील ऐतिहासिक गावजत्रा मैदानावर देवेंद्र फडणवीस यांनी ज्या–ज्या वेळी जाहीर सभा केल्या. आमदार लांडगे यांनी पिंपरी–चिंचवडकरांचे प्रश्न आणि मागण्या त्यांच्यासमोर ठेवल्या. त्या सभांमध्ये दिलेल्या सर्व आश्वासनांची त्यांनी पूर्तता केलेली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा याच मैदानावर फडणवीस यांनी 'रेडझोन'बाबत पिंपरी–चिंचवडकरांना आश्वासित केले आहे. त्यामुळे रेडझोनमधील मिळकतधारक,उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिक अशा २ लाख पिंपरी–चिंचवडकरांच्या आशा आता पल्लवीत झाल्या आहेत. पिंपरी–चिंचवड शहरातील सुमारे २ लाख मिळकतधारक, लघु व मध्यम उद्योजक यांना दिलासा देण्यासाठी 'रेड झोन' हद्द कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

आमदार महेश लांडगे यांनी 'रेड झोन मुक्त पिंपरी–चिंचवड'ची मागणी केली. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले आहे. 'रेड झोन'चा तिढा सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्यासाठी संरक्षण विभाग आणि मोदी सरकार निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेणार आहे.

**– शिवाजीराव आढळराव पाटील.**

# तळवडेचा चेहरामोहरा बदलणार.. जैवविविधता उद्यान उभारणार

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com




**पिंपरी:–**पिंपरी–चिंचवड महापालिकेच्या वतीने तळवडे येथील रेड झोन हद्दीतील ५८ एकर गायरान जागेत जैवविविधता उद्यान (बायोडायव्हर्सिटी पार्क) विकसित करण्यात येणार आहे. शहरातील खासगी कंपन्यांकडील सीएसआर निधीतून हे पार्क उभारले जाणार आहे.

हे पार्क देशातील आगळेवेगळे उद्यान ठरणार असल्याचा विश्वास महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील महाविकास आघाडीच्या काळात ही गायरान जागा राज्य शासनाकडून महापालिकेस विनामूल्य देण्यात आली, तेथे हरीण (डीआर) पार्क उभारण्यात येणार होते. मात्र, आता जैवविविधता उद्यान तयार केले जाणार आहे. त्यात वेगवेगळ्या वनस्पती, दुर्मीळ औषधी झाडे व वेली, देशी जातीची झाडे, फळ व फुलांची झाडे लावण्यात येणार आहेत. त्यासाठी दीड वर्षाचा कालावधी लागणार आहे. देशातील हे सर्वांत मोठे जैवविविधता उद्यान ठरणार असल्याचा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. या ५८ एकरपैकी चार–चार एकरांतील दोन प्रकल्पांसाठी कासारवाडीतील दोन कंपन्यांनी 'सीएसआर अंतर्गत निधी दिला आहे. खासगी एजन्सी नेमून तो प्रकल्प उभाण्याचा आराखडा तयार झाला आहे. उर्वरित ५० एकर जागेतही खासगी कंपन्यांकडून सीएसआर फंड घेऊन प्रकल्प उभारले जाणार आहेत. **लोकवस्ती वाढल्याने डीआर पार्कला फुली..** नियोजित हरीण (डीआर) पार्कसंदर्भात महापालिकेने वनविभागाकडून अभिप्राय घेतला होता, या जागेशेजारी औद्योगिक परिसर असल्याने शहरीकरण वाढले आहे. त्यामुळे भविष्यात मानवी हस्तक्षेप होण्याची शक्यता आहे. हरणांसाठी मोकळ्या गवताळ प्रदेशाची आवश्यकता असते. येथे हरणांचा कृत्रिम अधिवास तयार करणे उचित होणार नाही, असा अभिप्राय पुण्यातील भांबुर्डा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी पालिकेस दिला. त्यामुळे ते नियोजन रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक चार एकरात एंका थीमवर झाडांची लागवड करून संवर्धन केले जाणार आहे. वेगवेगळ्या वनस्पती, दुर्मीळ औषधी व वेली, देशी जातीची झाडे लावण्यात येतील. त्या–त्या जागेवर पूर्ण प्रकल्पांची माहिती दर्शविणारे फलक असणार आहेत, पर्यटकांना फिरण्यासाठी ट्रैक असणार असून, खाद्यपदार्थाचे स्टॉलही असणार आहेत. तळवडेतील बायोडायव्हर्सिटी पार्क अनोखे असेल. महापालिकेची एकूण १९४ सार्वजनिक उद्याने आहेत, ती ४७४ एकर क्षेत्रात विकसित केली गेली आहेत, त्यातील काही निवडक उद्यानांत विविध धीमच्या आधारे सुशोभीकरण केले जाणार आहे. दुबईतील प्रसिद्ध कारंजे, मुंबईतील मायानगरी, जगातील सात आश्चर्ये या संकल्पनेवर उद्याने विकसित करण्यात येणार आहेत.

# वैद्यकीय व्यावसायिक म्हणून स्वतःची योग्यता उंचावत न्यावी-डॉ.राकेश शर्मा



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**पुणे:-**''वैद्यकीय व्यावसायिक म्हणून स्वतःची योग्यता उंचावत न्यावी.कारण ज्ञान आपल्याला निर्भय करते आणि विवेक शिकवते,'' असे प्रतिपादन नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसीनच्या (एनसीआयएसएम) बोर्ड ऑफ द एथिक्स अँड रजिस्ट्रेशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसीनचे अध्यक्ष डॉ. राकेश शर्मा यांनी केले. नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा), ऑब्स्ट्रेटिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटी (ओबीजीवाय), महाराष्ट्र, सुमतीबाई शहा आयुर्वेद महाविद्यालय आणि भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आयुर्वेद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उदघाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

तीन दिवसांची ही परिषद मांजरी येथील स्वोजस पॅलेस येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस ८००हून अधिक वैद्यकीय व्यावसायिक सहभागी झाले होते. याप्रसंगी 'निमा' सेंट्रल कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, 'ओबीजीवाय'च्या अध्यक्ष डॉ. कामिनी धीमान, डॉ. एस. एफ. पाटील, श्री. अनिल गुजर, श्री. अरुण गुजर, डॉ. तुषार सूर्यवंशी, डॉ. मंदा घोरपडे, डॉ. सुहास हेर्लेकर, डॉ. मनोज गायकवाड, डॉ. विष्णु बावणे, डॉ. प्रियंका नाकाडे, डॉ. मनोज चौधरी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजक सचिव डॉ. सुजित शिंदे हे होते. डॉ. प्रशांत दळवी, डॉ. राहुल गरुडकर, डॉ. प्रदीप मुसळे, डॉ. प्रकाश दैठणकर, डॉ. उमेश लूनावत, डॉ. विवेक जोग, डॉ. हृषिकेश वाघमारे, डॉ. अमोल साबळे, डॉ. कमलाकर गजरे, डॉ. ज्योती गवळी, डॉ. तृप्ती गावडे, डॉ. रितेश दामले यांनी परिषदेच्या आयोजनात मोलाचे योगदान दिले. उद्घाटन सत्राच्या सोहळ्यात ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक, अध्यापक डॉ. पुष्पा तुळपुळे यांचा जीवनगौरव सन्मान देऊन गौरव करण्यात आला. डॉ. अर्पिता शहा लिखित ग्रंथाचे, 'सुश्रुती २०२४' या स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. डॉ. कामिनी धीमान यांनी 'ओबीजीएन'च्या कार्याची, विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. मंदा घोरपडे, डॉ. तुषार सूर्यवंशी, डॉ. आशुतोष कुलकर्णी यांचीही भाषणे झाली. डॉ. तुळपुळे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. राकेश शर्मा यांनी आपल्या भाषणात स्त्रीशक्तीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' ही आपली परंपरा आहे. स्त्रियांनी आपले कर्तृत्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सिद्ध केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. राकेश शर्मा पुढे म्हणाले, ''वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप समस्या वाटू नये. प्रत्येकाला ती अनिवार्य आहे. पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी कॉलेजमध्ये फिरकत नाहीत, हेही अयोग्य आहे. अशा 'ऑन पेपर पोस्ट ग्रॅज्युएट स्टूडेंटस'वर बंदी घातली पाहिजे. आयुर्वेदाच्या वैद्यकीय व्यावसायिकांनी प्राचीन ज्ञानपरंपरेचा ठेवा जपला आणि वृद्धिंगत केला पाहिजे.''

डॉ. हेर्लेकर यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. डॉ. अर्पिता शहा व डॉ. अनुजा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विभावरी वैद्य यांनी धन्वंतरी स्तवन केले. डॉ. अजयराज बाळ व डॉ. सुचिता राजेभोसले यांनी आभार मानले.

# मुकुंद प्रकाशन संस्था पुणे वतीने मातृदिनानिमित्त आदर्श मातांचा सन्मान सोहळा संपन्न



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**पिंपरी:**दापोडीत येथे स्त्री शक्ती जागरण मंच व मुकुंद प्रकाशन संस्थेतर्फे मातृदिनानिमित्त मोठ्या पदावर कार्यरत असणाऱ्या होतकरू युवकांच्या मातांना 'आई'सन्मान गौरव पुरस्कार २०२४ देण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र असे होते.

दापोडी येथील डॉ.गोयल हॉल येथे सदरचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मातृदिनाचे महत्त्व व आदर्श आई' या विषयावर सुनीता आडसुळे म्हणाल्या, ''आजच्या मातांनी चूल व मूल ही संकल्पना सोडून आजच्या स्पर्धेच्या युगात पुढे आले पाहिजे. मुक्ताबाई जवळकर, सुरवंता भातांबरेकर,हौसाबाई वाखारे, सुवर्णा भालेकर,रंजना मोरे,लीलाबाई आकले, संगीता वाव्हळ, फातिमा शेख, वर्षा शिंदे यांना मुकुंद प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, व स्त्री शक्ती जागरण मंच अध्यक्षा सुनीता आडसुळे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. यावेळी चंद्रकात सोनवणे यांनी आपल्या आईची माहिती व स्त्रीशक्ती परिस्थीची जाणीव करून दिली.आई-वडीलांची व समाजाची सेवा निस्वार्थी पणी केली पाहिजे आईचे संस्कार व कष्ठ यांचे जतण केले पाहिजे तसेच आपल्या आईने आपली मुले संस्कारमय आदर मय घडविली पाहिजे असे चंद्रकात सोनवणे यांनी सांगितले.यावेळी कू.भाग्यश्री चंद्रकात सोनवणे यांच्या हस्ते पण काही पुरस्कार देण्यात आले. यावेळी.अस्मिता कांबळे, संगिता बेलुरे,शैला भगत,निकीता होटके,शालन जाधव,प्रतिभा जवळकर,शिला गायकवाड,रेखा कांबळे,बेबी जाधव,आरती सोनवणे, निलीमा सोनवणे,मुकुंदा सोनवणे,आदी यावेळी उपस्थित होते.सुत्रसंचालन हेमा क्षिरसागर,व आभार माधवी बाईत यांनी केले. adv

# महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी बजावला सहपरिवार मतदानाचा हक्क..!

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**थेरगाव:-** मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला. थेरगाव येथील संचेती प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील मतदान केंद्रावर पावणे नऊच्या सुमारास बारणे यांनी मतदान केले. यावेळी श्रीरंग बारणे यंच्या पत्नी सरिता, पुत्र प्रताप व विश्वजीत, सून स्नेहा यांनी देखील मतदान केले.

# लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराच्या प्रचार खर्चाची मर्यादा ९५ लाख रूपये

**पुणे:-**मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी ५९ लाख रुपये (२०२४) तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे),काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष,शेकाप-मित्रपक्ष महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी ५७ लाखांचा खर्च केला आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणुकीसाठी १३ मे २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. ४ जून २०२४ रोजी बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये मतमोजणी पार पडणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराच्या प्रचार खर्चाची मर्यादा ९५ लाख रूपये इतकी आहे. मावळ लोकसभा मतदार संघामध्ये एकूण ३३ उमेदवार निवडणूक रिंगणात होते.

उमेदवारांच्या दररोजच्या खर्चाचे लेखे आणि खर्चाच्या पावत्या या लेखांकन पथकाकडे जमा केल्या जात होत्या. व्हिडिओ नियंत्रण व पाहणाऱ्या पथकाकडून आलेल्या अहवालानुसार शॅडो रजिस्टरमध्ये उमेदवाराचा रोजचा प्रचारखर्च नोंदवला गेला. या खर्चाची तीनवेळा तपासणी करण्यात आली.

'त्यामध्ये उमेदवारांनी केलेला खर्च समोर आला आहे. महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी ५९ लाख १६६ रुपयांचा खर्च केला आहे. त्याखालोखाल महाआघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी ५७ लाख १२ हजार ५४२ रुपयांचा खर्च केला. दरम्यान, दोघांच्याही निवडणूक खर्चात तफावत आढळली आहे.त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दोघांनाही नोटीस बजावली. तर, अपक्ष उमेदवार शिवाजी जाधव, यशवंत पवार आणि संतोष उबाळे या तीन उमेदवारांनी दैनंदिन खर्चाचे लेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन (२०२४) दिले नाहीत. त्यामुळे त्यांनाही नोटीस दिली आहे.

# वाकडमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्नेहा कलाटे यांच्यावतीने अनोखा उपक्रम..!

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com



**वाकड:-** मावळ लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी पिंपरी चिंचवडमधील वाकड परिसरात एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे. वाकड येथील स्नेहा कलाटे यांच्याकडून मतदान करणाऱ्या मतदाराला एक झाड भेट म्हणून देण्यात आले. स्नेहा कलाटे यांनी राबविलेल्या या अनोख्या उपक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात आज निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून प्रशासनाकडून अनेक उपक्रम राबवण्यात आले. दरम्यान वाकड येथील सामाजिक कार्यकर्त्या स्नेहा कलाटे यांनी देखील एक अभिनव उपक्रम राबवला आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून सौ. कलाटे यांनी मतदान करणाऱ्या प्रत्येक मतदाराला एक झाड भेट म्हणून दिले आहे. मतदानाचा टक्का वाढवण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाला हातभार लावण्याचा प्रयत्न स्नेहा कलाटे यांनी केला आहे. त्यांनी राबवलेल्या या उपक्रमाला वाकड परिसरातील मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. स्नेहा कलाटे यांनी राबवलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# वाणिज्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सेलॉन फिनसर्व या कंपनीतर्फे फिनएज २.० या परिषदेचे आयोजन



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**पुणे:-** वाणिज्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सेलॉन फिनसर्व या कंपनीतर्फे फिनएज २.० या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला प्रमुख अतिथी म्हणून , उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक श्री.संजय तात्याबा भिसे उपस्थित होते. सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल सेलॉन फिनसर्व कंपनीतर्फे श्री.संजय भिसे यांचा सन्मानचिन्ह आणि शाल प्रदान करून गौरव करण्यात आला. या परिषदेला संबोधित करताना , श्री. संजय भिसे म्हणाले ; दैनंदिन जीवनात आर्थिक शिस्तीचे महत्त्व अनन्यसाधारण साधारण आहे . कुटुंबाच्या गरजा पूर्ण करून , योग्य गुंतवणूक करून जवळ असलेल्या पैश्यांची वृद्धी करणे आवश्यक आहे . याच विचारधारेला पुढे घेऊन जाणारी फिनएज २.० ही परिषद पथदर्शी म्हणावी लागेल . या परिषदेला , नॅशनल इन्शुरन्स अकॅडमीचे डायरेक्टर श्री तरुण अग्रवाल, एचडीएफसी बँकेचे व्हाईस प्रेसिडेंट मुकूंद मुळे , कंपनीचे संचालक संतोष सुरपूरे, राघवेंद्र बडगुजर आणि प्रशांत जोगी आदी उपस्थित होते.